नि.फौ.ख.क्र.३७१/२०२५
सरकार –वि– शेख अहमद
निशाणी क्रमांक १९

**सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०४ ची साक्ष शपथेवर सुरू :–**

माझे नाव :– निकेश अशोक जैन
वय :– ३२ वर्ष, व्यवसाय :– व्यवसाय,
राहणार :– शेगांव, ता.शेगांव, जि. बूलडाणा.

**सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू :–**

१. मी दिनांक २७.०२.२०२५ ते दिनांक ०४.०३.२०२५ मी गुजरात येथे होतो व दिनांक ०५.०३.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मी माझ्या घरी परत आलो असता मेन गेटचे कुलुप उघडले असता दार बंद होते व एका बाजुचे दार उघडे दिसले त्या दारातुन आम्ही घरात प्रवेश केला असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. घरातील कपाट उघडे होते, दिवाण उघडे होते, मुलांची मनीबँक तोडलेली होती. माझ्या घरी अंदाजे ४० हजार रोख रक्कम व सोन्याची चैन, सोन्याचे कानातले शोधाशोध केली असता मिळुन आले नाही. माझ्या घरुन अंदाजे २०–२५ ग्रॅमचे सोने चोरीला गेले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यास गेलो. आता मला फिर्याद व छापील फिर्याद दाखविली. त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२० व २१** देण्यात येतो. पोलीसांनी घटनास्थळी येवुन पंचनामा केला. त्यावेळी चंद्रकांत, विशाल हजर होते. पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. पाच ते सहा महिन्यांनंतर पोलीसांचा फोन आला व चोरीचे दागीने मिळाल्याचे सांगीतले. परंतु आरोपी बददल काही सुचना दिल्या नाही. मी पोलीस स्टेशनला गेलो नाही. आरोपीला पाहिले नाही. मला आरोपीचे नांव माहीती नाही व पोलीसांनी मला आरोपीचे नांव सांगीतले नाही. आरोपीचे छायाचित्र कधी पाहीले नाही. चोरी गेलेला माल परत मिळालेला नाही. पोलीसांनी माझ्याकडे विद्युत देयकाची मुळ प्रत घेतली. आता मला सदर प्रत दाखविली. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येतो.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री.मिरगे वकील साहेब यांचेमार्फत.**

२. मी पोलीसांना चोरीला गेलेल्या दागीन्यांच्या पावत्या दिल्या नाही. हे म्हणने खरे नाही की माझ्या घरी चोरी झाली नाही त्यामुळे मी पावत्या दिल्या नाही. पोलीसांना जबाब देतांना मी असे सांगीतले होते की, दिनांक ०५.०३.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मी माझ्या घरी परत आलो असता मेन गेटचे कुलुप उघडले असता दार बंद होते व एका बाजुचे दार उघडे दिसले त्या दारातुन आम्ही घरात प्रवेश केला असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते, घरातील कपाट उघडे होते, दिवाण उघडे होते, मुलांची मनीबँक तोडलेली होती. माझ्या घरी अंदाजे ४० हजार रोख रक्कम होती. सदर बाबी माझे बयाणात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. मी किती वाजता फिर्याद दिली त्याचा वेळ मला सांगता येत

नाही. साक्षीदार सांगतो की अंदाजे ४.०० वाजता फिर्याद दिली असेल. मी फिर्याद एकदाच दिली होती. मी तोंडी फिर्याद दिली होती. हे म्हणने खरे नाही की रिपोर्ट दिल्यानंतर पोलीसांशी संपर्क आला नाही. साक्षीदार सांगतो की रिपोर्ट दिल्यानंतर पोलीस घरी आले होते. ज्यादिवशी रिपोर्ट दिला त्यादिवशी पोलीस आले होते, त्यानंतर आले नाही. हे म्हणने खरे नाही की माझ्या घरी चोरी झाली व त्यामध्ये सोन्याचे दागीने व नगदी रक्कम चोरी गेली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.** **माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.03.11 17:07:52 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ११.०३.२०२६.**

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ११.०३.२०२६**